वसई विरार शहर महानगपालिका
मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प) जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com


**प्रशासकिय ठराव क्रं.** 1260

**विभाग :- सामान्य प्रशासन**
**दिनांक :-** 08/09/2025

**प्रस्तावाचा विषय** : गणेशोत्सव - २०२५ अंतर्गत श्री गणेशमुर्ती विसर्जन करीता १) नारंगी जेटी नं. २२ व २) मारंबळ पाडा जेटी या ठिकाणी मनुष्यबळासह प्रत्येकी २ बोटी भाड्याने पुरविणेकरीता मागविण्यात आलेल्या दरपत्रकास मंजुरी मिळून करारनामा करुन कार्यादेश देणेकरीता मंजुरी मिळणेबाबत

**प्रस्तावाचा मजकुर** :

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | - | १, ८५, ०००/- |
| प्रशासकीय मान्यता | - | मा. आयुक्त ठराव क्र. १२७४ दि.२२/०८/२०२५ |
| दरपत्रक सुचना प्रसिध्दी | - | दि.२२/०८/२०२५ |
| दरपत्रक उघडण्याची दिनांक | - | दि.२६/०८/२०२५ |
| प्राप्त दरपत्रक उघडणारे अधिकारी | - | सहा. आयुक्त |

विहित मुदतीत खालीलप्रमाणे तीन दरपत्रके व मागणी प्रमाणे उपलब्ध कागदपत्रे या बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव | दरपत्रक धारकाचा प्राप्त झालेला दर | बोटीचे नोंदणी प्रमाणपत्र | आधारकार्ड | पॅनकार्ड | बँक पासबुक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. आत्मराम कोळी | १,५५,००० | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २ | श्री. रमाकांत रा. पाटील | १,४८,००० | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| ३ | श्री. अजय कोळी | १,७०,००० | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार श्री. रमाकांत पाटील यांची रक्कम १,४८,०००/- दराची निविदा इतर प्राप्त निविदेतधिल सर्वात कमी दराची असून योग्य व वाजवी आहे.

या कामी संविदा मंजुरी प्राप्त करणे लघुत्तम निविदा धारकासोबत करारनामा करुन कार्यादेश देणे तसेच काम सुरु करुन विहित मुदतीत पूर्ण करणे इत्यादी प्रक्रिया वरील नमुद कालमर्यादेत पूर्ण करणे सद्यस्थितीत शक्य नाही. कारण दिड दिवसाचे श्री गणेशमुर्ती विसर्जन दि. २८/०८/२०२५ तसेच पाच दिवसाचे गणेश मुर्ती विसर्जन दि.३१/०८/२०२५ रोजी होत असल्याने कमी दरपत्रक ठेकेदारास काम सुरु करणेस तोंडी मंजुरी देण्यात आलेली आहे. जेणेकरुन श्री गणेशमुर्ती विसर्जन करीता अडथळा निर्माण होऊ नये व गणेश भक्तांची गैर सोय होऊ नये.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ (ड) अन्वये उपरोक्त कामाची संविदा करणेस व करारनामा करुन कार्यादेश देणे तसेच कामपूर्ण झाल्यानंतर देयक अदा करणेस शिफारशीसह प्रशासकीय व वित्तिय मान्यतेस्तव संविनय सादर.

**प्रस्तावाचा निर्णय** : सदर विषयानुसार तीन दरपत्रक प्राप्त झालेली असून ठेकेदारांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. प्राप्त तीनही दरपत्रके पात्र असल्याने लघुत्तम दराचा निविदाधारक श्री. रमाकांत रा. पाटील यांची रक्कम रु. १,४८,०००/- कमी असून मला प्राप्त असलेल्या अधिकारात तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ (ड) अन्वये उपरोक्त कामाची संविदा करणेस व करारनामा करुन कार्यादेश देणेकामी मुदतीत शक्य नसल्याने मंजुर ठेकेदारास तोंडी आदेश देऊन गणेशमुर्ती विसर्जनाचे काम करण्यास तसेच कामपूर्ण झाल्यानंतर देयक रक्कम रु. १,४८,०००/- अदा करणेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी** (भाप्रसे)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

४१५

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता.वसई, जि.पालघर पिन नं.401303
दुरध्वनी :- 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स :- 0250-2525107
ई-मेल :- vasaivirarcorpoation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र. :-** १२८१

**विभाग :- क्रीडा विभाग**
**दिनांक :-** ११/०९/२०२५

**प्रस्तावाचा विषय :-** पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन या क्रीडा संस्थेस वित्त सहाय्य मंजुर करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** उपरोक्त विषयानुसार सादर करण्यांत येते की, पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन ही संस्था नोंदणीकृत संस्था असून संस्था नोंदणी अधिनियम,१८६० अन्वये (नोंदणी क्र.महा/९०२/१६/ठाणे) अन्वये व मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये (नोंदणी क्र.एफ/३३११८/ठाणे) नोंदणीकृत क्रीडा संस्था आहे.

पालघर जिल्ह्यातील बॅडमिंटन खेळाडूंना विविध स्तरावर सहभाग घेण्यासाठी पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन विविध वयोगटाच्या स्पर्धा आयोजन करीत असते. तसेच जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा व निवडचाचणी स्पर्धा राबवणे तसेच निवड झालेल्या खेळाडूंना राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर पाठविणे हे खर्चिक असून बरेचश्या खेळाडुंची घरची परिस्थीती अत्यंत गरिबीची असल्याने अशा खेळाडूंचा पूर्ण खर्च असोसिएशनला करावा लागतो. याकरीता पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन या क्रीडा संस्थेने महानगरपालिकेकडून खेळ व खेळाच्या प्रगतीसाठी जास्तीत जास्त वित्त सहाय्य मिळावे याकरिता दिनांक.१८/०७/२०२५ रोजी मागणी अर्ज केला आहे. महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२ मधील विषय क्र.८ राज्यातील क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन या विषया मधील बाब ८.२ नुसार क्रीडा संस्थाना वार्षिक वित्त सहाय्य देण्याची तरतुद आहे. यास अनुलक्षुन राज्यात क्रीडा संस्कृतिचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी नोंदणीकृत जिल्हा क्रीडा संघटना यांना मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६ दिनांक १४/०८/२०१७ अन्वये वार्षिक वित्त सहाय्य देण्यासाठी मंजुरी आहे.

महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण २०१२ व मा.सर्वसाधारण सभा दिनांक १४/०८/२०१७ ठराव क्र.१६ ला अनुलक्षुन पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन या क्रीडा संस्थेस प्रोत्सानपर वित्त सहाय्य वार्षिक रुपये ५ लक्ष देणेकामी विभागामार्फत प्रस्तावीत करण्यात येत आहे.

सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात क्रीडा विषयक राखीव तरतुद अतंर्गत क्रीडा संस्थाना व व्यायाम शाळांना या योजने अंतर्गत वित्त सहाय्य देणेकामी रु.२ कोटी ५० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली आहे.सदरचा खर्च नमुद लेखाशिर्षा मधुन भागविता येईल.

तरी पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन यांच्या मागणी अर्जानुसार,महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण २०१२ व मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६ दिनांक १४/०८/२०१७ अन्वये अनुलक्षुन पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन यांना सन २०२५-२६ करिता वार्षीक रुपये ५ लक्ष इतके क्रीडा प्रोत्साहन पर वित्त सहाय्य मंजुर करुन संबंधीतांना अदा करणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त महोदयांच्या मान्यतेकामी ठेवणेंस पुढील आदेशास्तव सादर.

**प्रस्तावाचा ठराव :-** प्रस्तावात नमुद पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन यांच्या मागणी अर्जानुसार,महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण सर्वसाधारण सभा.व मा २०१२ ठराव क्र.१६ दिनांक १४/०८/२०१७ ला अनुलक्षुन पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन यांना वार्षीक रुपये ५ लक्ष इतके क्रीडा प्रोत्साहन पर वित्त सहाय्य देणे कामी आर्थीक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

संदर्भ पत्रान्वये वसई विरार शहर महानगरपालिका व पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन यांच्या संयुक्त विदयमाने १९ वर्षाखालील आंतर जिल्हा व राज्य अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करणेकामी अंदाजीत रक्कम रुपये १२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदर स्पर्धा ही वसई विरार शहर महानगरपालिका व पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात यावी, अशी संस्थेने मागणी केली आहे.

सबब वसई विरार शहर महानगरपालिका व पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन यांच्या संयुक्त विदयमाने १९ वर्षाखालील आंतर जिल्हा व राज्य अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करणेकामी व त्याकामी होणारा खर्चास मान्यता मिळावी तसेच पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन या स्पर्धेचे आयोजन करणेकामी रक्कम रुपये १२ लक्ष इतके वित्तीय सहाय्य देणेकामी व स्पर्धा आयोजनानंतर केलेल्या खर्चाचे विवरणपत्र सादर करणेच्या अटींवर अदा करणेंस सदरच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका व पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन यांच्या संयुक्त विदयमाने १९ वर्षाखालील आंतर जिल्हा व राज्य अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करणेकामी व त्याकामी होणारा खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच पालघर जिल्हा बॅडमिंटन फाउंडेशन या स्पर्धेचे आयोजन करणेकामी रक्कम रुपये १२ लक्ष इतके वित्त सहाय्य मंजूर करण्यात येत असून संस्थेने स्पर्धा आयोजनानंतर केलेल्या खर्चाचे विवरणपत्र वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये सादर करणेच्या अटींवर अदा करणेच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

**प्रशासकीय ठराव क्र.** १२८३ **दि.** १८/०९ **/२०२५.**

........................................................................................................................................

**विषय** :- श्री.भावेश भरत भोईर यांना त्यांचे वडिल श्री. भरत गणपत भोईर, सेवानिवृत्त सफाई कामगार यांच्या जागी वारसा हक्काने "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती देणेबाबत...

**प्रस्तावाचा मजकूर** : वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील **सेवानिवृत्त सफाई कामगार श्री. भरत गणपत भोईर** यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असताना त्यांची **नियुक्ती तत्कालीन नवघर माणिकपूर नगरपरिषद दि.१६ जुन १९९५ चा आदेश क्र.एमसीके-१०९४/सीआर-५४८/९४/३ अन्वये माहे ५/०५/१९९४ पासून सफाई कामगार या पदावर करण्यात आलेली आहे.**. श्री.भरत गणपत भोईर, सफाई कामगार हया **नियत वयोमानानुसार दि.३०/०६/२०२४ रोजी सेवानिवृत्त** झालेल्या आहेत. त्यांची **एकूण ३० वर्ष सेवा** झालेली आहे.

**संदर्भिय क्र.१ चे अर्जानुसार श्री. भावेश भरत भोईर यांनी** माझे वडिल श्री.भरत भोईर हे आपल्या महानगरपालिकेत कार्यरत असताना दि.३०/०६/२०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहे. त्यांच्या पश्चात मी श्री.भावेश भोईर माझ्या कुटूंबाच्या संमती पत्रान्वये आपल्या वसई विरार शहर महानगरपालिकेत लाड कमिटी शिफारसीनुसार सोबत जोडलेल्या कागदपत्र आधारे मला त्यांच्या जागी नोकरी मिळावी. तरी महोदयांनी लाड समिती शिफारसी नुसार नोकरी द्यावी ही विनंती असे कळविले आहे. सोबत सोबत **१.**शाळा सोडल्याचा दाखला **२.** आधार कॉर्ड/पॅन कॉर्ड,**३.** कुटूंबाचे राशन कॉर्ड, **४.** जातीचा दाखला, **५.** इतर सदस्यांचे संभाळ करण्याचे प्रमाणपत्र, **६.** इतर सदस्यांचे संमतीपत्र, **७.** शैक्षणिक अर्हता, जोडलेला आहे.

**सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांच्या वारसा हक्क नियुक्ती प्रस्तावाचे छाननी पत्रक**

**अ) सेवानिवृत्त सफाई कामगारांची माहीती**

| अ.क्र. | माहितीचा तपशिल | आवश्यक कागदपत्रे | | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | **श्री. भरत गणपत भोईर** | १) वारस लाड/पागे तत्वाने नियुक्ती बाबत विनंती अर्ज. | | |
| २ | जन्म दिनांक. २३/०६/२०२४ | सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत जोडलीआहे. | | |
| ३ | नियुक्ती दिनांक ०५/०५/१९९४ | सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत जोडलीआहे. | | |
| ४ | मुळ नियुक्ती पध्दत- | सफाई कामगार | | |
| ५ | सफाई कामगार या पदावरुन पदोन्नती दिली आहे काय असल्यास पदनाम | पदोन्नती दिलेली नाही. | | |
| ६ | महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणुन केलेली एकुण सेवा- | ३० वर्षे | | |
| ७ | कोणत्या पदावर सेवासमाप्ती | **सफाई कामगार** | | |
| ८ | कोणत्या तारखेला पद रिक्त | -------------------------- | **दि.३०/०६/२०२४** | |
| ९ | सेवासमाप्तीचा प्रकार | **नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त** | | |
| १० | पद रिक्त झाल्याचे कारण | **नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त** | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | सेवा कालावधीनुसार वारस पात्र आहे काय | **होय, पात्र आहे...** | | |

**ब) वारसाची माहीती**

| | **तपशिल** | | **पुरावा दाखल कागदपत्र** |
|---|---|---|---|
| १ | वारसाचे नाव | **श्री.भावेश भरत भोईर** | |
| २ | वारसाचे नाते | मुलगा | सोबत कागपत्र जोडलेले आहेत. |
| ३ | वारसाचा जन्म दिनांक | दि. ०६/१२/२००२ | शाळा सोडल्याचा दाखला |
| ४ | वारसाचे अर्ज करते वेळी वय | एकुण २२ वर्ष | अनुज्ञेय आहे... |
| ५ | वारस हक्क नियुक्तीसाठी मनपाकडे प्राप्त वारसाचा अर्ज दिनांक | वारस मुलगा यांचा अर्ज दि. २०/०८/२०२४ | पात्रता योग्य आहे |
| ६ | वारसाची शैक्षणीक अर्हता | बी.कॉम | साक्षांकीत दाखला |
| ७ | वारसाची जात | **हिंदु आग्री (OBC)** | जातीचा दाखला आहे |
| ८ | सफाई कामगारांचा मृत्यु / सेवानिवृत्त/ स्वेच्छा निवृत्ती /रुग्णता सेवा निवृत्ती झाला असल्यास पात्र वारसाचे संम्मती पत्र | कुटूंबातील इतर सदस्यांचे संम्मतीपत्र | कुटूंबातील एकूण व्यक्ती - |
| ९ | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात राहत असल्या बाबत पुरावा | रेशन कार्ड क्रमांक NO. | त्याच कुटुंबात राहत असल्याबाबत रेशकार्ड जोडले आहे. SE.no. ५९७१०३ रेशन कार्ड |
| १० | अर्जदाराशी नाते किंवा सांभाळ करणा-या व्यक्तीचे नाव | मुलगा | **सेवेसाठी पात्र** |
| ११ | प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय | होय | प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे. |
| १२ | जात पडताळणी प्रमाणपत्र आहे काय | | शासन निर्णय दि. ११/०३/२०२४ नुसार शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ मधिल अनु क्र. ८.४ नुसार नियुक्ती देण्यापूर्वी जात जातवैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे. |
| १३ | वारस कोणत्या पदासाठी पात्र होऊ शकेल. | वारसाची शैक्षणिक बी.कॉम असल्याने त्यांना सफाई कामगार या पदासाठी ते पात्र ठरतात. | लिपिक-टंकलेखक |
| १४ | शिफारस | वारस श्री.भरत गणपत भोईर वारसा हक्काने महानगर पालिका सेवेत सफाई कामगार या पदासाठी पात्र आहे. | |

**संदर्भ क्र.२ अन्वये** सहा.आयुक्त, प्रभाग समिती एच नवघर माणिकपूर यांचेकडिल श्री.भावेश भरत भोईर यांना श्री.भरत गणपत भोईर सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे जागी वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबतची नस्ती दि.०७/०७/२०२५ रोजी आस्थापना विभाग, मुख्यालय येथे प्राप्त झालेली आहे.

**संदर्भ क्र.३ शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे**:-

५. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्ती-

**१३.** अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग.

१४. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार**.

१५. पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे. अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.**

२. **सफाई कामगारांकरीता वारसाहक्काची तरतूद**:- शासकीय/निमशासकीय/**महानगरपालिका**/ नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट बोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेवरील उपरोक्त (१) येथे नमूद व्याख्येनूसार सफाई कामगारांना त्यांच्या **सेवानिवृत्तीनंतर**, मृत्यूनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर सफाई कामगाराचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्याचे कुटूंब बेघर होऊ नयेआणि त्यास सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने, लाड समितीच्या शिफारशीनूसार संबंधित सफाई कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानूसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

३. **वारसा हक्काने पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस :-**

३.१ पती/पत्नी

**३.२ मुलगा** / मुलगी

३.३ सून /जावई

३.४ विधवा मुलगी / बहिण/घटस्फोटीत मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहित मुलगी अविवाहित बहिण.

३.५ सफाई कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचा सख्खा भाऊ/सख्खी बहीण

३.६ नात/नातू

३.७ वरील पैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सादर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास सफाई कामगाराचा तहहयात सांभाळ करण्याची लेखी शपथपत्राव्दारे हमी देणारी संबंधित नामनिर्देशित व्यक्ती असे नमूद आहे.

**७. सफाई कामगाराच्या वारसास शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती:-**

**७.१**शासकीय/निगशासकीय/महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट वोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था / अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेच्या सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील ज्येष्ठता यादीतील सफाई कामगाराच्या वारसास त्याची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्याआधारे त्यांची नेमणूक वर्ग-४ किंवा वर्ग-३ मध्ये करावी.

**७.२ नियुक्ती प्राधिकारी यांनी अशी कार्यवाही करताना संबंधित सफाई कामगाराचा वारस हा वर्ग-३ वा वर्ग-४ मधील कोणत्याही पदासाठी शैक्षणिक अर्हता प्राप्त करीत असल्यास त्याची शैक्षणिक**

**अर्हता विचारात घेऊन त्यानुसार त्यास वर्ग-३ वा वर्ग-४ च्या पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करावी. मात्र वर्ग ३ चे पद उपलब्ध असल्यास व संबंधित वारसाची इच्छा असल्यास त्याला प्राधान्याने वर्ग ३ च्या पदावर नियुक्ती दयावी.**

**७.३** एखाद्या सफाई कामगाराचा वारस हा वर्ग-३ तसेच वर्ग-४ च्या पदासाठी शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र ठरत असेल आणि त्याने वर्ग-३ च्या पदासाठी इच्छुकता दर्शविली असेल, मात्र संबंधित कार्यालयात वर्ग-३ चे पद रिक्त नसेल तर संबंधित वारसास भविष्यात वर्ग-३ च्या रिक्त पदावर नियुक्ती मिळण्याच्या अधिन राहून वर्ग- ४ मधील रिक्त पदावर वारसा हक्काने नियुक्ती देण्यात यावी व तसे नियुक्ती आदेशात नमूद करावे.

**संदर्भ क्र.४ व ५** मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठ, मुंबई यांचे आदेश दि.०८/०१/२०२५ च्या अनुषंगाने मा.उप-सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र दि.२८ जानेवारी,२०२५ नूसार प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे दि.०८/०१/२०२५ चे आदेश विचारात घेऊन तसेच दिनांक २४/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये तसेच त्यानुषंगाने वेळोवेळी विहीत केलेल्या शासन निर्णयांस व सुधारणा/ शुध्दीपत्रकातील तरतुदींस अनुसरुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

**शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-**

४. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. **शौचालय स्वच्छता**, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी **संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या व्यक्ती**-

**श्री. भरत गणपत भोईर यांनी प्रभाग समिती एच नवघर माणिकपूर येथे घाणीशी संबंधीत साफ-सफाईचे कामकाज केलेले आहे. श्री. भावेश भरत भोईर यांचे शाळा सोडल्याच्या दाखल्यावरून त्यांचे वय २३ वर्षे असुन त्यांनी सादर केलेल्या जातीच्या दाखल्यावरून ते इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गात मोडत असल्याचे समजते. तसेच त्यांनी केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्रानुसार ते बी.कॉम (पदवीधर) असल्याचे समजते.**

**सबब शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदीनुसार श्री.भरत गणपत भोईर, सफाई कामगार (सेवानिवृत्त) यांचा वारस मुलगा श्री.भावेश भरत भोईर यांनी धारण केलेली शैक्षणिक अर्हतेनुसार व इतर अटी शर्तीच्या अधिन राहून वारसाहक्काने महानगरपालिका सेवेत "लिपिक-टंकलेखक" या पदावर नियुक्ती देणेबाबतच्या** प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**निर्णय/ठराव**:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी **श्री.भरत गणपत भोईर, सफाई कामगार हे नियत वयोमानानुसार दि.३०/०६/२०२४ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३** मधील तरतुदीनुसार त्यांचा मुलगा **श्री.भावेश भरत भोईर** यांना वारसाहक्काने महानगरपालिका सेवेत "**लिपिक-टंकलेखक**" या पदावर अटी व शर्तीस अधिन राहून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी, (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** १२८४

विभाग :- परिवहन
दिनांक :- १८/०९/२०२५

---

**प्रस्तावाचा विषय :-** आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त वसई विरार शहर महानगरपालिका तर्फे शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थी व इतर सहभागी नागरिकांना कार्यक्रमाच्या ठिकाणी ने-आण करणेकामी अंदातिज २० बस उपलब्ध करुन घेणेस तसेच त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिन प्रत्येक वर्षाच्या माहे सप्टेंबर मधिल तिसऱ्या शनिवारी साजरा केला जातो. या वर्षी दि.२०/०९/२०२५ रोजी आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिन साजरा करावयाचा आहे. हा दिवस लोकांना कचऱ्यापासून किनारे मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी, जागतिक महासागर आणि जलमार्गांचे जतन आणि संरक्षण करण्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी पाळला जातो.

आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त (International Coastal Cleanup Day - ICCD) उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सुरूची बिच, वसई (प.) येथे किनारपट्टी स्वच्छता मोहिम राबविणेकरिता सदर बिचची राज्य शासनाद्वारे निवड केली असून दि. २० सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ७.०० वाजता किनारपट्टी स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. सदर ठिकाणी स्थानिक समुदाय, अशासकीय संस्था, समुद्रकिनारी वापरकर्ते, शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी, स्काउट्स विद्यार्थी, खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रादेशिक अधिकारी, स्थानिक पदाधिकारी, महिला बचतगट, पर्यटक इ. मिळून एकुण अंदाजीत १००० नागरीक सहभागी होणार आहेत. याकामी साहित्य स्थलांतरीत करणे व शाळांमधुन विद्यार्थ्यांना घेऊन येणे व निर्देशीत ठिकाणांवर परत सोडणेकरिता वाहतूक सुविधा पुरविणेकामी २० बस (५० आसनापर्यंत) ची आवश्यकता असलेबाबत संदर्भिय पत्रान्वये घनकचरा व्यवस्थापन विभागाने कळविलेले आहे.

त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेत परिवहन सेवेचे बस ऑपरेटर यांना संदर्भ क्र. २ अन्वये मे. एस.एन.एन (भागिदारी संस्था) यांना बस पुरवठा करणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ०३ अन्वये त्यांनी परिवहन सेवेत सुरु असलेल्या वेळापत्राकतील ४१ आसनी गाडया विशेष बस सेवेसाठी देणे आवश्यक झाल्यास प्रवासी गैरसोय हावून तक्रारी निर्माण होती. करिता सदरच्या बस पुरवठा करणे शक्य नाही असे कळविलेले आहे.

**सदरचा उपक्रम हा आंतरराष्ट्रीय स्तरावर असल्याने व त्यासाठी कमी कालावधी शिल्लक असल्याने या उपक्रमासाठी तातडीने बस उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.** सदर उपक्रमास अत्यंत अल्प कालावधी शिल्लक राहिलेला असल्याने दरपत्रक / ई-निविदा प्रसिद्ध करुन बस उपलब्ध करुन घेणे शक्य होणार नाही. त्याकरिता

२० बस  बाजारातील खाजगी बस पुरवठादार यांचेकडे विचारणा केली असता खालीलप्रमाणे दरपत्रक प्राप्त झालेली आहेत.

| अ.क्र | कंपनीचे नाव | कंपनीचा दर |
|---|---|---|
| १ | मे. कॅशलेस टूर्स अँड ट्रॅव्हल्स | रु. १०,५००/- (प्रती बस) (सर्व करासहीत) |
| २ | मे. प्रिन्स ट्रॅव्हल्स | मा. मुंबई महानगर प्राधिकरण यांचे दि. १९ ऑक्टोंबर, २०१९ रोजीचे मंजूर दर |
| ३ | मे. दिप्शीका ट्रॅव्हल्स | रु. १०,०००/- (प्रती बस) (सर्व करासहीत) |

उपरोक्त तक्त्यातील मे. प्रिन्स ट्रॅव्हल्स या कंपनीने मा. मुंबई महानगर प्राधिकरण यांनी दि. १९ ऑक्टोंबर, २०१९ रोजी मंजूर केलेल्या भाडे दरानुसार २० बस पुरवठा करणेस तयार असलेबाबत कळविलेले आहे.

२० बस करिता संदर्भ क्र. ३ अन्वये मा. मुंबई महानगर प्राधिकरण यांचे मंजूर दर खालीलप्रमाणे :-

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | २४ तास व १०० कि.मी. साठीचा एकूण व दर इंधन, चालक व मदतनीसासह (रुपये) | २० बससाठी होणारा खर्च | वस्तू व सेवा कर (१२%) | एकूण अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २० बस (५० आसनापर्यंत) | ८२९० | १,६५,८००/- | १९,८९६/- | १,८५,६९६/- |

उपरोक्त बाबींचा विचार करता २० बस तातडीने भाडे तत्वावर उपलब्ध करुन घ्यावयाचे असल्यास र.रु. १,८५,६९६/- इतका खर्च अपेक्षित आहे. जर सर बस **एस.टी महामंडळामार्फत उपलब्ध करुन घ्यावयाचे झाल्यास  प्रती बस पोटी रु. ११,०००/- व २० बसपोओ रु. २,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदरच्या बस मे. प्रिन्स ट्रॅव्हल्स उपलब्ध करुन घेतल्यास महानगरपालिकेची रु. ३४,३०४/- आर्थिक बचत होईल.**

त्याकरिता  मे. प्रिन्स ट्रॅव्हल्स महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसुची - ड प्रकरण ५ संविदा २(२) च्या तरतूदी नुसार बस उपलब्ध करुन घेणे शक्य आहे. सदरील बस पुरवठा करणेकामी होणारा खर्च र.रु.१,८५,६९६/- सन २०२५-२६ या अर्थसंल्पातील ""सामान्य प्रशासन अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी कार्यालयीन वापराकरिता भाडे तत्वावर वाहन भाडे"" या लेखाशिर्षांतर्गत करता येईल.

तरी आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त (International Coastal Cleanup Day - ICCD) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसुची - ड प्रकरण ५ संविदा २(२) च्या तरतूदी नुसार मे. प्रिन्स ट्रॅव्हल्स यांचेकडून २० बस भाडे तत्वावर उपलब्ध करुन घेणेकामी संविदा करणेस तसेच त्याकामी होणाऱ्या र.रु. १,८५,६९६/- (अक्षरी एक लक्ष पंच्याऐंशी हजार सहाशे शहाण्णव मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**प्रस्तावास मंजूरी :-** मा. आयुक्त महोदय यांनी दिलेल्या मंजूरीनुसार आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त ( International Coastal Cleanup Day - ICCD) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसुची - ड प्रकरण ५ संविदा २(२) च्या तरतूदी नुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेकडून २० बस भाडे तत्वावर उपलब्ध करुन घेणेकामी त्यांचे समवेत संविदा करणेस तसेच त्याकामी होणाऱ्या र.रु. ३,०८,२००/- (अक्षरी तीन लक्ष आठ हजार दोनशे मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(दिपक सावंत)
अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

p135

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. 401 303
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** १२८५

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १८/०९/2025

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विविध पाणी पुरवठा जलवाहिन्या पश्चिम रेल्वेच्या ट्रॅक खालून अंथरलेल्या असल्याने त्या अनुषंगाने वे लीव चार्जेस पश्चिम रेल्वेकडे भरणा करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्याबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना भुतपुर्व ४ नगरपरिषदा व परीसरातील ५५ गावांचा समावेश होऊन शासनाने दि.०३ जुलै, २००९ रोजी केली आहे. महापालिका स्थापनेपुर्वी पेल्हार, उसगांव, सुर्या टप्पा-१ व टप्पा-२ या पाणी पुरवठा योजनेतील मुख्य जलवाहिन्या पश्चिम रेल्वेच्या ट्रॅक खालून क्रॉसींग करण्याकरीता परवानगी घेऊन कामे केली आहेत. सद्य:स्थितीत महापालिका क्षेत्रास खालील प्रमाणे पाणी पुरवठा होत आहे.

| अ. क्र. | योजना | उपलब्ध असणारा पाणी पुरवठा (द.ल.ली.प्रतिदिन) | सद्या होणारा पाणी पुरवठा (द.ल.ली. प्रतिदिन) |
|---|---|---|---|
| १ | पेल्हार | १० | १० |
| २ | उसगांव | २० | २० |
| ३ | सुर्या टप्पा -१ | १०० | १०० |
| ४ | सुर्या टप्पा - ३ | १०० | १०० |
| ५ | MMRDA ४०३ | १७० | १४० |
| **एकूण** | | **४००** | **३७०** |

महापालिकेस सद्य:स्थितीत उपलब्ध होणारे पाणी पूर्वेकडून पश्चिमेकडे नेण्याकरीता खालील प्रमाणे विविध ठिकाणी पश्चिम रेल्वेच्या ट्रॅकखालून जलवाहिन्या क्रॉसींग केल्या आहेत.

| Sr.No. | Sub/Details of work | For the year period | Way leave amount | Paid Amount | Outstanding Amount (with GST) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | VR- Laying 1000 mm dia M.S. Pipe over bridge bet. G.P. 52/9-10 | 2016-17 to 2025-26 | 21843372.00 | 0 | 21843372.00 |
| 2 | VR - Laying 300 mm dia D.I. pipe line through railway culvert no. 83 bet. Elect. Pole 58/11-12 | 2013-14 to 2022-23 & 2023-24 to 2032-33 | 9823573.20 | 0 | 9823573.20 |
| 3 | NSP - ermission for laying 600 mm sleeve pipenear L.C. 38 | 2001-02 to 2028-29 | 14620549.00 | 0 | 14620549.00 |

p 137

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | BSR - Laying water pipe line at Km no. 61/10-12 | 2021-22 to 2030-31 | 7580348.00 | 0 | 7580348.00 |
| 5 | NSP - Permission to lay 400 mm dia M.S. Water pipe line through 800 mm dia M.S. casing pipe below the track at Km 55/14-15 | 2023-24 to 20257-58 | 4888082.00 | 0 | 4888082.00 |
| 6 | NSP - Permission to lay 400 mm dia M.S. Water pipe line cross railway line under new ROB bet. G.P. 55/13-14 | 2018-19 to 2028-29 | 4201156.00 | 4201156.00 | 0 |
| 7 | VR - Permission ofr laying 400 mm M.S. pipe across railway track at G.P. no. 60/8-10 near culvert 84 | 2018-19 to 2028-29 | 5103968.00 | 5103968.00 | 0 |
| 8 | VR - laying of 3" dia water pipe line under the railway track | 2018-19 to 2028-29 | 12655941.00 | 12655941.00 | 0 |
| **Total Outstanding Amount (with GST)** | | | | | **58755924.20** |

पश्चिम रेल्वे मार्फत वरील प्रमाणे रक्कम रु.५,८७,५५,९२४/- भरणा करण्याबाबत दि.१८/०३/२०१५, दि.०२/०२/२०१७, दि.२७/०२/२०१८, दि.०४/१०/२०१९, दि.१०/०३/२०२१, दि.२१/००/२०२२, तसेच दि.२६/०६/२०२५ रोजीच्या पत्रांन्वये महापालिकेस कळविण्यात आले आहे. यापुर्वी काही रक्कम टप्प्या-टप्प्याने महापालिकेने पश्चिम रेल्वेकडे भरणा केली असून महापालिकेची सद्याची आर्थीक परिस्थिती विचारात घेऊन सदर रक्कम भरण्याच्या दृष्टीने प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला नव्हता. सद्य:स्थितीत पश्चिम रेल्वे मार्फत सदर रक्कम भरणा करण्याबाबत वारंवार तगादा लावण्यात येत आहे.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वितरण व्यवस्था बळकटीकरण व विस्तारीकरण या योजनेअंतर्गत जलवाहिन्या २ ठिकाणी पश्चिम रेल्वेच्या ट्रॅकखालून तर २ ठिकाणी मध्यरेल्वेच्या ट्रॅकखालून अशा एकूण ४ ठिकाणी रेल्वे क्रॉसींग करणे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर रेल्वे क्रॉसींग अनुषंगाने पश्चिम रेल्वेकडे महानगरपालिकेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. मात्र उक्त प्रमाणे वे लीव चार्जेस पोटी रक्कम पश्चिम रेल्वेकडे भरणा केली नसल्याने सदरचे प्रस्ताव नाकारण्यात आले आहेत. शासन स्तरावर वेळोवेळी होणाऱ्या आढावा बैठकीत कामाच्या प्रगतीबाबत वारंवार निर्देश देण्यात येत असून शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार अमृत २.० अंतर्गत मंजूर प्रकल्प विहित कालमर्यादेत पुर्ण करणे बंधनकारक आहे. सदर प्रकल्पाची कामे वेळेत पुर्ण करण्यासाठी रेल्वे क्रॉसींगची कामे वेळेत पुर्ण होणे आवश्यक आहे. उक्त प्रमाणे वे लीव चार्जेस भरणा केलेनंतर पश्चिम रेल्वेकडून रेल्वे क्रॉसींग करणे करीता परवानगी प्राप्त होणार आहे. त्यामुळे रु.५,८७,५५,९२४/- ही वे लीव चार्जेस पोटीची रक्कम पश्चिम रेल्वेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

सदर खर्च पाणी पुरवठा विभागाअंतर्गत "विकास निधी अंतर्गत पाणी पुरवठा योजना मुख्य जलवाहिनी व्यवस्था" या लेखाशिर्षावरून भागविणे शक्य असून सदर खर्चास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत शासनाने महापालिकेवर प्रशासकाची नेमणूक केली असून सदरचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान आहेत.

p139

तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेने पश्चिम रेल्वेच्या ट्रॅक खालून अंथरलेल्या विविध पाणी पुरवठा योजनांच्या जलवाहिन्यांच्या अनुषंगाने पश्चिम रेल्वेच्या मागणीनुसार वे लीव चार्जेस पोटी रु.५,८७,५५,९२४/- पश्चिम रेल्वेकडे भरणा करण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे सादर.

---

**ठराव :-**

१. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रास उपलब्ध होणारे पाणी पूर्वेकडून पश्चिमेकडे नेण्याकरीता सन २००१-०२ पासून ८ वेळा मुख्य जलवाहिन्या पश्चिम रेल्वेच्या ट्रॅक खालून क्रॉसींग करण्याकरीता परवानगी घेऊन कामे करण्यात आल्याचे प्रस्तावात नमुद करण्यात आले आहे.
२. जलवाहिन्या रेल्वे क्रॉसींग करणेकामी यापुर्वी वे लीव चार्जेचपोटी काही रक्कम टप्प्या-टप्प्याने महापालिकेने पश्चिम रेल्वेकडे भरणा केली असून महापालिकेची सद्याची आर्थीक परिस्थिती विचारात घेऊन सदर रक्कम भरण्याच्या दृष्टीने प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला नव्हता.
३. केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत जलवाहिन्या २ ठिकाणी पश्चिम रेल्वेच्या ट्रॅकखालून तर २ ठिकणी मध्यरेल्वेच्या ट्रॅकखालून अशा एकूण ४ ठिकाणी रेल्वे क्रॉसींग करणे प्रस्तावित असून रेल्वे क्रॉसींग अनुषंगाने पश्चिम रेल्वेकडे महानगरपालिकेमार्फत प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. मात्र वे लीव चार्जेस पोटी रक्कम पश्चिम रेल्वेकडे भरणा केली नसल्याने सदरचे प्रस्ताव नाकारण्यात आले आहेत.
४. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार अमृत २.० अंतर्गत मंजूर प्रकल्प विहित कालमर्यादेत पुर्ण करणे बंधनकारक असून प्रकल्पाची कामे वेळेत पुर्ण करण्यासाठी रेल्वे क्रॉसींगची कामे वेळेत पुर्ण होणे आवश्यक आहे.
५. उक्त प्रमाणे वे लीव चार्जेस भरणा केलेनंतर पश्चिम रेल्वेकडून रेल्वे क्रॉसींग करणे करीता परवानगी प्राप्त होणार आहे. त्यामुळे रु.५,८७,५५,९२४/- ही वे लीव चार्जेस पोटीची रक्कम पश्चिम रेल्वेकडे भरणा करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी **(भा.प्र.से.)**
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जि-पालघर,पिन नं.-४०१३०५
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६,फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. :- १२८६

विभाग :- वाहन
दिनांक :-१८/०९/२०२५

**प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचा MMRDA पुरस्कृत "मुंबई वन ॲप्लिकेशन" मध्ये समावेश करणेकामी युझर इंटरफेस तयार करणेकामी कमी दराचे दरपत्रक मंजूर करुन त्यांचेसमवेत संविदा करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर** :- वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचा MMRDA पुरस्कृत "मुंबई वन ॲप्लिकेशन" मध्ये समावेश करणेकामी युझर इंटरफेस तयार करणेकामी इच्छुक व्यक्ती, पुरवठादार व संस्था यांचेकडुन दि.२३/०७/२०२५ ते दि.२८/०७/२०२५ या कालावधीत दुपारी ३.०० वाजता बंद पाकीटातुन दरपत्रक (कोटेशन) महापालिकेच्या www.vvcmc.in या संकेत स्थळावर मागविण्यात आलेले होते. तसेच सदरचे जाहिर दरपत्रक महापालिका मुख्यालय येथील नोटीस बोर्डवर लावणेत आलेले होते. इच्छुक पुरवठादाराकडुन दि.२८/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात आले होते. सदर मुदतीत एकुण ३ दरपत्रके प्राप्त झाली.

प्राप्त ३ दरपत्रकातील दरांची तुलनात्मक पडताळणी केली असता दरपत्रक खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | दरपत्रकातील दर | दर सर्व करासंहित |
|---|---|---|---|
| १ | मे. एस.के.एक्सपोर्टस् (इंडिया) | ८,७०,०००/- | १०,२६,०००/- |
| २ | मे. डाटा वॉइस सोल्युशन प्रा.लि. | ८,४५,०००/- | ९,९७,१००/- |
| ३ | मे. सायबरसोल टेक्नोलॉजिस प्रा.लि. | ८,६५,०००/- | १०,२०,७००/- |

प्राप्त ३ दरपत्रकामधील दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. कमी दराचे दरपत्रकामधील दर बाजारभावाप्रमाणे पडताळणी केले असता योग्य व वाजवी आहेत.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचा MMRDA पुरस्कृत "मुंबई वन ॲप्लिकेशन" मध्ये समावेश करणेकामी युझर इंटरफेस तयार करणेकामी प्राप्त दरपत्रकामधील मे. डाटा वॉइस सोल्युशन प्रा.लि. यांचे र.रु.९,९७,१००/- इतके कमी दराचे दरपत्रक मंजुर करुन त्यांचेसमवेत संविदा करणेस प्रस्ताव मा. आयुक्त यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

**प्रस्तावास मंजुरी** :- वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचा MMRDA पुरस्कृत "मुंबई वन ॲप्लिकेशन" मध्ये समावेश करणेकामी युझर इंटरफेस तयार करणेकामी प्राप्त दरपत्रकामधील मे. डाटा वॉइस सोल्युशन प्रा.लि. यांचे र.रु.९,९७,१००/- इतके कमी दराचे दरपत्रक मंजुर करुन त्यांचे समवेत संविदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्याता देण्यात येत आहे.

(दिपक सावंत)
अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३.
दुरध्वनी :- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स :- ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** १२८८ | **विभाग:- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक:-** १९ / ०९ /**२०२५**

**प्रस्तावाचा विषय :-** **मे. श्री. अनंत एंटरप्रायझेस यांचा ठेका रद्द करुन त्यांना काळया यादीत टाकून त्यांचे जागी पर्यायी व्यवस्था होणेसाठी सक्षम ठेकेदाराची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर:-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कचरा संकलन, रस्ते सफाई, गटार सफाई इ. कामासाठी नऊ प्रभाग निहाय २० झोन तयार करून शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार दैनंदिन रस्ते सफाई कामासाठी मनपास मनुष्यबळ पुरविणे व इतर साधन सामुग्री पुरवठा करण्याचा अभिकर्त्यांना २०१७-१८ च्या निविदेनुसार त्रैवार्षिक ठेका देण्यात आलेला आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत A ते I प्रभाग समितीमध्ये एकुण ३३९७ सफाई कर्मचाऱ्यांची ठेका तत्त्वावर मंजूर अभिकर्त्यांमार्फत दैनंदिन साफसफाईच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार ठेकेदारांमार्फत नियुक्त कामगार यांना शासनाच्या किमान वेतन कायद्यान्वये मासिक वेतन अदा करण्यात येते. त्यामध्ये पी.एफ समाविष्ट आहे. त्यानुसार मे श्री. अनंत एंटरप्रायझेस यांना दि. ३०/०१/२०१८ रोजी करारनामा करुन दि. २८/०२/२०१९ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**नोटीस क्र. १ :**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ए मधील दैनंदिन कचरा संकलन करणे, रस्ते झाडणे तसेच गटार सफाई करणेसाठी मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांना नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्रात दैनंदिन कचरा उचलला जात नसुन अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिग जमा झाल्याबाबत पदाधिकारी यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार त्यांना या कार्यालयातील दि. ०७/०८/२०२५ रोजीची दैनंदिन कचरा संकलन करित नसल्याबाबत नोटीस बजावण्यात आली होती. सदर नोटीसच्या अनुषंगाने मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांचा दि. १२/०८/२०२५ रोजीचा खुलासा खालीलप्रमाणे प्राप्त झाला आहे.

**खुलासा :**

सदर खुलाशामध्ये त्यांनी आपण २०१८ पासून करत असलेल्या कामाबद्दल नमूद केले असून झालेल्या त्रुटींबद्द विशेष लक्ष देऊन काम करणेबाबत व मनपास झालेल्या तसदी बद्दल क्षमस्व असल्याबद्दल नमूद केले आहे. ( संपुर्ण खुलासा पृष्ठ क्र.        वर जोडलेला आहे.)

**विभागाचे अभिप्राय :**

सदरची नोटीस ही निविदेतील मुद्दा क्र. ३३ अन्वये Agency Event of Default या अंतर्गत देण्यात आलेली होती. तथापि, त्यानुसार त्यांनी मोघम लेखी उत्तर विभागास

कळविले होते. सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रभाग समिती ए अंतर्गत कार्यरत स्वच्छता निरीक्षक यांना नोटीस बजावणेत आली होती. सदर नोटिसीच्या अनुषंगाने स्वच्छता निरीक्षक यांचे खालीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत.

प्रभाग समिती "ए" कार्यक्षेत्रातील स्वच्छता विषयक कामे करुन घेणेसाठी स्वच्छता निरीक्षक या पदावर नेमणूक करणेत आलेली आहे. सदर नोटिसीच्या अनुषंगाने मी परीसराची पाहणी केली. सदर पाहणी अंती रस्त्या लगत कचरा प्लास्टिक, झाडे झुडूपे पडल्याचे निदर्शनास आले. तसेच डोंगरपाडा तलावाजवळ ठेवलेल्या निर्माल्य कलशामध्ये व तलाव परिसरामध्ये मोठ्याप्रमाणत कचरा जमा झाल्याचेही निदर्शनास आले. सदर बाबत संबंधित ठेकेदार व मुख्यालयात देखील दुरध्वनीद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार ठेकेदारामार्फत कर्मचारी पाठवून सदर ठिकाणाची तातडीने साफसफाई करण्यात आली.

**नोटीस क्र. २ :**

मनपामार्फत सफाई कर्मचारी यांच्या वेतन, ग्रॅज्युटी, आरोग्य विमा, तसेच साफसफाई संदर्भात वेळोवेळी बैठका आयोजित केल्या जातात. सदर बैठकीत उपस्थित राहणेसाठी वेळोवेळी कळविण्यात येते. तथापि सदर बैठकीत उपरोक्त ठेकेदार अनुपस्थितीत असतात. त्यामुळे त्यांना सदर बाबत उपरोक्त नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार त्यांचा दि. १२/०८/२०२५ रोजी खुलासा खालीलप्रमाणे प्राप्त झालेला आहे.

**खुलासा :**

दर खुलाशामध्ये प्रकृती खराब असून डॉक्टरांचे उपचार सुरु आहेत. त्यामुळे बैठकीस उपस्थित राहू शकत नाही, असे नमूद केलेले आहे. तसेच, सफाई कर्मचारी यांना रेनकोट व सँडल देण्यात आलेले आहेत. तसेच गणवेश सप्टेंबर महिन्यात देण्यात येतील, असे नमूद केलेले आहे. ( संपुर्ण खुलासा पृष्ठ क्र.      वर जोडलेला आहे.)

**विभागाचे अभिप्राय :**

तथापि, सन २०१७-१८ च्या निविदेनुसार महापालिकेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छता विषयक बैठकीस हजर राहणे ठेकेदाराचे दायित्व असताना संबंधित ठेकेदार दि.०६/०८/२०२५ रोजीच्या बैठकीस हजर राहीले नाहीत. तसेच सदरच्या बैठकीस ठेकेदाराचे अगर त्यांचे प्रतिनिधी हजर राहण्याबाबत कोणत्याही प्रकारची कल्पना अगर पत्र विभागास कळविले नाही. तसेच निविदेतील अटी शर्तीनुसार मुद्दा क्र. २ The Scope of Work for Sweeping of Streets मधील मुद्दा क्र. Y नुसार कर्मचाऱ्यांना संरक्षण साहित्य व गणवेश यांचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. तथापि नोटीस दिल्यानंतर संबंधित कर्मचारी यांना संरक्षण साहित्यांचा पुरवठा करणेत आलेला आहे. परंतु गणवेशचा पुरवठा माहे सप्टेंबर २०२५ पर्यत देण्यात येईल, असे सदर खुलासामध्ये कळविलेले आहे. सदरचा खुलासा हा विभागास समाधानकारक नसल्याचे आढळून येत आहे.

**नोटीस क्र. ३ :**

मा. आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखाली दि. ११/०८/२०२५ रोजी घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कामकाजाबाबत आढावा घेणेसाठी बैठक घेणेत आलेली होती. सदर बैठकीमध्ये मा. आयुक्त सो. यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये स्थळ पाहणी करीत असताना तसेच सामान्य लोकांच्या तक्रारी नुसार महापालिका क्षेत्रामध्ये जागोजागी अस्वच्छता असल्याचे निदर्शनास आल्याने दि. १३/०८/२०२५ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांचा दि. २०/०८/२०२५ रोजीचा खुलासा खालीलप्रमाणे प्राप्त झालेला आहे.

**खुलासा :**

सदर खुलाशामध्ये त्यांनी आपण सन २०१८ पासून करीत असलेल्या कामाबाबत तसेच झालेल्या त्रुटी बद्दल विशेष लक्ष देऊन शहर रद्द करणेबाबत व सर्व सफाई कामगारांना अधिक कार्यक्षमतेने काम करणेबाबत व अधिक यंत्रणेचा वापर करुन शहर स्वच्छ करणेबाबत नमूद केलेले आहे. ( संपुर्ण खुलासा पृष्ठ क्र.      वर जोडलेला आहे.)

**विभागाचा अभिप्राय :**

सदर खुलासामध्ये विभागास अभिप्रेत असलेले उत्तर प्राप्त झालेले नाही. देण्यात आलेले उत्तर हे यापुर्वी ही देण्यात आलेल्या नोटिसीस खुलासामध्ये सादर केलेले आहे. सदरचा खुलासा हा मोघम असुन विभागास समाधानकार नसल्याचे आढळून येत आहे.

**नोटीस क्र. ४ :**

ग्लोबल सिटी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात कचरा जमा झाल्याचे व रस्त्याच्या दुभाजकामध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असून दुभाजकची साफसफाई होत नसल्याचे व सदर परिसरातील सोसायटींमधील कचऱ्याच्या डब्यांमधील कचरा ३ ते ४ दिवस उचलला जात नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे त्यांना दि. १०/०९/२०२५ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांचा दि. १५/०९/२०२५ रोजीचा खुलासा प्राप्त झालेला आहे.

**खुलासा :**

सदर खुलासामध्ये देखील त्यांनी आपण सन २०१८ पासून करीत असलेल्या कामाबाबत तसेच झालेल्या त्रुटी बद्दल विशेष लक्ष देऊन शहर स्वच्छ करणेबाबत व सर्व सफाई कामगारांना अधिक कार्यक्षमतेने काम करणेबाबत व अधिक यंत्रणेचा वापर करुन शहर स्वच्छ करणेबाबत नमूद केलेले आहे. ( संपुर्ण खुलासा पृष्ठ क्र.      वर जोडलेला आहे.)

**विभागाचा अभिप्राय :**

सदर खुलासामध्ये विभागास अभिप्रेत असलेले उत्तर प्राप्त झालेले नाही. देण्यात आलेले उत्तर हे यापुर्वी ही देण्यात आलेल्या नोटिसीस खुलासामध्ये सादर केलेले आहे. सदरचा खुलासा हा मोघम असुन विभागास समाधानकार नसल्याचे आढळून येत आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रभाग समिती ए अंतर्गत कार्यरत स्वच्छता निरीक्षक यांना दि. १०/०९/२०२५ रोजी नोटीस बजावणेत आली होती. सदर नोटिसीच्या अनुषंगाने स्वच्छता निरीक्षक यांचे खालीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत.

प्रभाग समिती "ए" कार्यक्षेत्रातील स्वच्छता विषयक कामे करुन घेणेसाठी स्वच्छता निरीक्षक या पदावर नेमणूक करणेत आलेली आहे. सदर नोटिसीच्या अनुषंगाने ग्लोबल सिटी, रुस्तमजी बचराज, अग्रवाल, एच.डी.आय.एल. इ. परीसराची पाहणी करणेत आली. सदर पाहणी अंती रस्त्या लगत कचरा, प्लास्टिक, झाडे झुडूपे पडल्याचे निदर्शनास आले. तसेच ग्लोबल सिटी, रुस्तमजी बचराज, अग्रवाल, एच.डी.आय.एल. इ. परिसरामध्ये मोठ्याप्रमाणत कचरा जमा झाल्याचेही निदर्शनास आले. सदर बाबत संबंधित ठेकेदार व मुख्यालयात देखील दुरध्वनीद्वारे कळविण्यात आले. त्यानुसार ठेकेदारामार्फत कर्मचारी पाठवून सदर ठिकाणाची तातडीने साफसफाई करण्यात आली.

तसेच निविदेतील अटी शर्तीतील मुद्दा क्र. २२.५ व २३ नुसार ठेकेदार सफाई कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्या अंतर्गत वेतन अदा करणे अनिवार्य आहे. तथापि, सदर कर्मचाऱ्यांना माहे ऑगस्टचे वेतन वेळेवर अदा न केल्यामुळे मनपा क्षेत्रातील विविध संघटना कार्यालयात भेट देऊन सफाई कर्मचाऱ्यांना कामाचा मोबदला वेळेवर का अदा केला जात नाही ? याबाबत मुख्यालयात विचारणा करण्यात आली. तसेच वेळेवर अदा नाही केले तर काम बंद करुन आंदोलन पुकारु, अशी धमकी देण्यात आली. सदरची घटना अतिशय निंदनीय असल्याने सदर संघटना ठेकेदाराच्या कृत्यामुळे मनपास वेठीस धरण्याचा प्रयत्न करीत होते. सदर बाबत ठेकेदाराच्या अधिनस्त काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विचारणा करण्यात आली असता, "महिना उलटून गेला तरी आम्हाला आमच्या कामचा मोबदला वेळेवर कधीच मिळत नाही. आम्हाला आमचा परिवार तसेच मुलांचे शिक्षण इ. बाबी महिन्याअंती पुर्ण करायच्या असतात परंतु ठेकेदाराकडे केलेल्या कामाचा मोबदला आम्हाला प्रत्येक वेळेस मागावा लागतो याची आम्हाला खंत वाटते, असे कर्मचाऱ्यांमार्फत सांगण्यात आले." तसचे सदर ठेकेदारामार्फत कर्मचाऱ्यांना वेतन अदा केले आहे किंवा कसे, याबाबत मौखिक आदेशान्वये प्रभाग समिती ए मधील झोन क्र १, प्रभाग समिती ई मधील झोन क्र. ९ व प्रभाग समिती सी मधील झोन क्र. ४ येथील कार्यरत आरोग्य निरीक्षक यांना विचारणा केली. त्यानुसार त्याचा तातडीन दि. १८/०९/२०२५ रोजीचा माहे ऑगस्ट २०२५ चे दि. १८/०९/२०२५ रोजीपर्यंत वेतन कर्मचाऱ्यांना अदा केलेले नाही, असा खुलासा प्राप्त झालेला आहे. त्यामुळे सदर ठेकेदार यांना कर्मचाऱ्यांच्या वेतनाबद्दल कोणत्याही प्रकारचे गांभिर्य नसल्यामुळे त्यांना दि. १८/०९/२०२५ रोजी नोटीस बजावण्यात आलेली आहे. तथापि, सदर ठेकेदार यांना वारंवार नोटीस बजावून देखील त्यांना कर्मचारी व कर्मचाऱ्यांच्या परिवारा विषयी तसेच स्वच्छतेबाबत काहीच गांभिर्य नाही. मग त्यांना वारंवार फक्त नोटीस का बजावता. तसेच सदर ठेकेदारावरती कोणतीही कार्यवाही अगर काळ्या यादीत का टाकत नाही ? याबाबत संघटना व कर्मचारी आक्रमक झाले.

त्यामुळे उपरोक्त सर्व बाबी पाहता मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांना नेमून दिलेल्या प्रभागामध्ये स्वच्छता होत नसल्याबाबत त्यांना वारंवार कल्पना देऊन, पत्र देऊन तसेच वरील संदर्भान्वये नोटीस बजावून देखील त्यांचे कामामध्ये सुधारणा होत नसून त्यांना सदर

कामाचे गांभिर्य नसल्याचे दिसून येत आहे. तसेच यापुर्वीही सदर ठेकेदारा संबंधित स्वच्छतेबाबत, कर्मचाऱ्याच्या वेतनाबाबत, संरक्षण साहित्यांचा पुरवठा न केल्याबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत होत्या. परंतु दैनंदिन रस्ते सफाई, गटर सफाई हे काम अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असल्यामुळे त्याचा प्रभागातील साफ सफाई तसचे नागरिकांच्या आरोग्याबाबत कोणत्याही समस्या उद्भवू नये याकरिता मनपाने ठेकेदारास योग्य ती समज देऊन काम करण्याची मुभा दिली.

परंतु, मे श्री अनंत एंटरप्रायझेस हे प्रभागमध्ये करत असलेल्या साफ सफाईच्या कामांबाबत नागरिकांच्या, पदाधिकाऱ्यांच्या तसेच विविध संघटनांच्या तक्रारी दुरध्वनी, तसेच मुख्यालयात मा. आयुक्त सो., अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग यांना प्रत्यक्ष भेटून प्राप्त होत आहेत. प्रभागातील स्वच्छता निरीक्षक यांच्या खुलासामध्ये मे. श्री अनंत एंटरप्रायझेस एंटरप्रायझेस हे परिसर स्वच्छ करीत नसल्याबाबत स्पष्ट दिसुन येते. तसेच सदर ठेकेदार त्यांच्या अधिनस्त काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना मासिक वेतन वेळेवर अदा करत नसल्याबाबत व संरक्षण साहित्य पुरवठा करत नसल्याबाबत स्थानिक संघटना आंदोलने करतात व मनपास वेठीस धरुन मनपाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे अश्या ठेकेदारांना वारंवार संधी देऊन देखील कामात सुधारणा होत नसल्यामुळे सदर ठेकेदार यांनी निविदेतील अटी शर्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी Termination of contract due to event of default अन्वये त्यांचा ठेका रद्द करुन त्यांना वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ३ वर्षासाठी काळ्या यादीत टाकणे, तसेच सदरचे काम हे अत्यावश्यक सेवेत असल्यामुळे प्रभागात दैनंदिन सफाईची कामे ही रोजच्या रोज होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा ठेका रद्द झाल्यास पर्यायी व्यवस्था होणेसाठी सक्षम ठेकेदार यांची मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांचे जागी नेमणूक करणे आवश्यक आहे, असे विभागास वाटते.

तरी, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई करणेसाठीच्या सन २०१७-१८ च्या निविदेतील अटी शर्तीनुसार नियुक्त केलेले ठेकेदार मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांना नेमून दिलेले काम ते योग्यरित्या करित नसल्याने त्यांच्या कंपनीचा ठेका रद्द करुन त्याचे कंपनीचे नाव वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ३ वर्षासाठी काळ्या यादीत टाकणेबाबत, तसेच सदर ठेकेदाराच्या दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई करुन कचरा संकलन करण्याच्या कामांसाठी पर्यायी व्यवस्था होणेच्या आवश्यकतेनुसार प्रभाग समिती "ए" झोन क्र. १ येथे मे. मेनदीप इंटरप्रायजेस, प्रभाग समिती "सी" झोन क्र. ५ येथे मे. हेना इंटरप्रायझेस व प्रभाग समिती "ई" झोन क्र. ९ येथे मे. दिनेश बी. संखे या ठेकेदारांची नेमणूक करणेकामी पुढीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**प्रस्तावाचा निर्णय :** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई करणेसाठी प्रभाग समिती ए, सी व ई मध्ये नियुक्त केलेले ठेकेदार मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांना देण्यात आलेले काम सन २०१७-१८ च्या निविदेतील अटी-शर्तीनुसार ते योग्यरित्या करीत नसल्याने त्यांना अनेकदा नोटीस बजावून देखील कामात सुधारणा केल्याचे दिसुन येत नाही. याबाबत मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांना कोणतेही गंभिर्य नसल्याने त्यांचा ठेका रद्द करुन त्याचे कंपनीचे नाव वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ३ वर्षासाठी काळ्या

यादीत टाकणेबाबत, तसेच सदर ठेकेदाराच्या दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई करुन कचरा संकलन करण्याच्या कामांसाठी पर्यायी व्यवस्था होणेच्या आवश्यकतेनुसार प्रभाग समिती "ए" झोन क्र. १ येथे मे. मेनदीप इंटरप्रायजेस, प्रभाग समिती "सी" झोन क्र. ५ येथे मे. हेना इंटरप्रायझेस व प्रभाग समिती "ई" झोन क्र. ९ येथे मे. दिनेश बी. संखे या ठेकेदारांची पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत नेमणूक करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी** (भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय विरार (प.), जि. पालघर, पिन नं.४०१३०३
दुरध्वनी २०२०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२८८

विभाग : आस्थापना विभाग
दिनांक :२५/०९/२०२५

**प्रस्तावाचा विषय :-** केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२५-२६ च्या अनुषंगाने Enviromental Engineers and Hydrologist यांची पदे मंजूर करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर:-** वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि. ०३ जुलै, २००९ रोजी झाली. त्यामध्ये वसई, विरार, नालासोपारा व नवघर-माणिकपुर या ४ नगरपरिषदांसह ५५ महसूली गावांचा समावेश आहे. वसई विरार शहर महानगरपालिका "क" वर्गीय महानगरपालिका असून, सद्यास्थितीत महानगरपालिकेची लोकसंख्या अंदाजे २५ लाखापेक्षा अधिक आहे. तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ३११ चौ.कि.मी. व महानगरपालिकेतील ९ प्रभाग समिती असून प्रभागांची संख्या ११५ इतकी आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेचा सुधारित आकृतीबंध दि. ०९/०९/२०२१४ रोजी मंजूर झालेला आहे. त्यामध्ये पर्यावरण अभियंता १ पद मंजूर असुन आणि जलशास्त्रांसारखी पदे मंजूर नाहीत.

केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२५-२६ च्या अनुषंगाने मा. उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्र. नप्रसं/कक्ष-१४/विसयो-२०२५२६/६४६७, दि. ०४/०९/२०२५ अन्वये सर्व महानगरपालिका यांनी सदर Advisory चे अवलोकन करुन उपरोक्त पदे Sanction करुन घेणे करीता शासनास लवकरात लवकर प्रस्ताव सादर करणेबाबत मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवि मुंबई यांस अवगत करावे अशी विनंती केलेली आहे.

सदर पदे मंजूर करुन घेऊन Advisory भारत सरकार आवासन व गृहनिर्माण मंत्रालय यांच्या मार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेले Minimum Qualification Criteria खालील प्रमाणे आहेत.

| Sr.no. | Post | Minimum Qualification Criteria |
|---|---|---|
| 1. | Environmental Engineer | **Essential:**<br>• Bachelor's degree in Environmental Engineering or Civil Engineering<br>• Master's degree in Environmental Sciences or Environmental Engineering<br>**Years of Work Experience:**<br>• Junior-२ years, Mid-level-५ years. Senior-१० years (These are indicative levels & can be decided as per State policy)<br>**Expertise In:**<br>• Experience in waste and wastewater management in urban and peri-urban areas, ensuring sustainable and compliant practices.<br>• Strong background in air and water quality control, with emphasis on meeting statutory compliance requirements.<br>• Involved in site remediation initiatives and actively |

| | | |
|---|---|---|
| | | promotes and implements sustainable environmental practices.<br>• Skilled in conducting environmental impact assessments for infrastructure projects, ensuring alignment with regulatory frameworks and sustainability objectives.<br>• Demonstrated expertise in sustainable environmental management for infrastructure development related to water, used water, and storm water, with a focus on source sustainability and regulatory compliance in urban and peri-urban areas.<br>• Extensive experience in environmental reviews for water resource planning, including demand-supply-gap assessments for surface water, groundwater.used water, and storm water, based on assumptions around population growth, water consumption, industrial development, seasonal variations, and sclimate change<br>• Skilled in designing treatment process schemes for surface and groundwater. used water, and storm water using both conventional and nature-based sobitions, with additional capabilities in bio solids management and a strong understanding of treatment infrastructure operations and maintenance.<br>• Knowledge of sustainable practices & disaster mitigation strategies for disaster prome zones including coastal zones & hilly areas & farge scale infrastructure projects.<br>• Proficient in the use of environmental modelling and digital tools for environmental quality management.<br>• Proven ability to work within multidisciplinary teams & with multiple stakeholders across planning, design, construction, and commissioning phases of water resource management projects. |
| 2. | Hydrologists | Essential:<br>• Bachelor's degree in Environmental Engineering, Civil Engineering, or Hydrology Engineering<br>• Master's degree in Environmental Engineering, Hydrology and Water Resources or Hydraulics & Water Resources Engineering<br>Years of Work Experience:<br>• Junior-२ years, Mid-level-५ years, Senior-१० years (These are indicative levels & can be decided as per State policy) |

| | | |
|---|---|---|
| | | Expertise In<br>• Extensive experience in urban hydrology and watershed management, with a focus on shallow aquifer systems, water table dynamics, and groundwater quality.<br>• Skilled in hydrologic and hydraulic modeling for stormwater, flood risk assessment, and runoff management, using GIS and simulation tools.<br>• Demonstrated ability to conduct water balance studies, rainfall-runoff analysis, and climate-resilient water resource planning based on hydro-meteorological data.<br>• Proficient in urban flood mitigation planning, including the design and assessment of natural and manmade drainage systems.<br>• Experience in implementing sustainable urban drainage systems (SUDS), recharge structures, and basin-level interventions to enhance water holding capacity.<br>• Capable of assessing point and non-point source pollution, and integrating pollution control in water resource planning.<br>• Skilled in the evaluation of competing water demands (domestic, industrial, ecological) and identifying measures to improve water use efficiency.<br>• Familiarity with hydrogeological mapping, land use and land cover analysis, and application of geospatial tools in water resource management.<br>• Strong ability to work in cross-functional teams and coordinate with planning, engineering, and disaster management authorities for water infrastructure projects. |

मा. उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील पत्र क्र. नप्रसं/कक्ष-/ विशेष सहाय्यक योजना २०२५-२६/६०९६, दि. १४/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केलेला मुद्दा क्र. A.४ नुसार पर्यावरण अभियंते आणि जलशास्त्रांज्ञाच्या पदांची मंजूरी - शहरांमध्ये, पर्यावरण अभियंते आणि जलशास्त्रांसारखी तज्ञ पदे एकतर अस्तित्वात भरलेली नाहीत. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि शाश्वत पद्धती सुधारण्यासाठी पर्यावरण अभियंत्यांची आवश्यकता आहे. त्यांच्या कामात कचरा व्यवस्थापन / सांडपाणी व्यवस्थापन, हवा आणि पाण्याची गुणवत्ता नियंत्रण आणि साइट रिमेडिएशन इत्यादीचा समावेश आहे. उथळ जलचर व्यवस्थापनाद्वारे कार्यक्षक पाणी व्यवस्थापनासाठी पाण्याच्या पातळी / गुणवत्तेचे निरीक्षण करण्यासाठी आणि शहरी पूर कमी करण्यासाठी तांत्रिक इनपुट प्रदान करु शकतात. लोकसंख्येनुसार प्रत्येक वैधानिक शहरात पदांची इच्छिता संख्या :

१. दहा लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरासाठी — ०३ पदे
२. एक लाख ते दहा लोकसंख्येसाठी ०२ पदे

वसई विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या अंदाजे २५ लाखापेक्षा अधिक असल्याने शहरात पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि शाश्वत पद्धती सुधारण्यासाठी

पर्यावरण अभियंत्यांची आवश्यकता आहे. त्यांच्या कामात कचरा व्यवस्थापन / सांडपाणी व्यवस्थापन, हवा आणि पाण्याची गुणवत्ता नियंत्रण आणि साइट रिमेडिएशन करीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये पर्यावरण अभियंताची १ पद मंजूर असून १ पद नवनिर्मित व जलशास्त्रज्ञ अभियंता २ पदे असे एकूण ३ पदे नवनिर्मित पदे निर्माण करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या अंदाजे २५ लाखापेक्षा अधिक असल्याने शहरात पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि शाश्वत पद्धती सुधारण्यासाठी पर्यावरण अभियंत्यांची आवश्यकता आहे. त्यांच्या कामात कचरा व्यवस्थापन / सांडपाणी व्यवस्थापन, हवा आणि पाण्याची गुणवत्ता नियंत्रण आणि साइट रिमेडिएशन करीता केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२५-२६ च्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये **पर्यावरण अभियंता (Enviromental Engineers) १ पद मंजूर असून १ पद नवनिर्मित** व **जलशास्त्रज्ञ अभियंता (Hydrologist) १ पदे असे एकूण २ पदे** नवनिर्मित पदे निर्माण करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे तसेच उपरोक्त **२ पदे नवनिर्मित** करणेस व सदरचा प्रस्ताव शासनास सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प), जि-पालघर, पिन नं. ४०१३०३

दुरध्वनी - ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५० - २५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्र. १२८९

विभाग :- वृक्षप्राधिकरण व उद्यान

दिनांक :- २५/०९/२०२५

---

**प्रस्तावाचा विषय :-** "१ कोटी वृक्ष लागवड मोहिम" अंतर्गत (मनवेल बांबू व तुलडा बांबू प्रजातीची ५०,००० रोपे) खाजगी रोप वाटीकेमधून खरेदीकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** उपरोक्त विषयांन्वये सादर करणेत येते की, मोठ्या प्रमाणात शहरीकरण व औद्योगिकरणामुळे वातावरण बदल होऊन जागतिक तापमान वाढ होत आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी आणि प्रदेशाचे नैसर्गिक सौंदर्य टिकवण्यासाठी वृक्षारोपण मोहिमेला अत्यंत महत्त्व आहे. त्यानुसार, सन २०२५ च्या पावसाळ्यात १० कोटी वृक्ष लागवडीची मोहिम राज्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत खाजगी मालकीचे पडीक क्षेत्र आणि शेत बांधावर, कालवा दुतर्फा तसेच रस्ता दुतर्फा क्षेत्रात, सामुहिक पडीक क्षेत्र व गायरान क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेता यावा तसेच सर्वसामान्य शेतकरी व वृक्षप्रेमी यांना रोपे उपलब्ध व्हावीत, यासाठी वन महोत्सवाच्या कालावधीत सवलतीच्या दरात रोपांचा पुरवठा करण्यात येईल असे संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार सुचना प्राप्त आहेत.

संदर्भ क्र. ४ नुसार मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर यांचे आदेशानुसार आपल्या वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये २ लाख वृक्षलागवड व संवर्धन करणेबाबत शासनाचे आदेश प्राप्त झाले आहेत. त्याअनुषंगाने, महानगरपालिका क्षेत्रात उपलब्ध असलेल्या जागेवर वृक्ष लागवड करणेकामी २ लक्ष रोपांची आवश्यकता आहे. त्याकरीता आवश्यकते प्रमाणे २ लक्ष रोपां पैकी १ लक्ष बांबूची रोपे लागवड करणेबाबत मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडून सुचना प्राप्त झाल्या आहेत.

तसेच माजी. आमदार श्री. विवेकभाऊ पंडीत यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील आदिवासी बांधव यांच्या समस्यांचे निवारण करणे संदर्भात दि.०६/०८/२०२५ रोजी महापालिकेच्या मिटींग हॉल मध्ये बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये वनहक्क दावे असलेल्या आदिवासी बांधवाना त्यांच्या जागेवर बांबूची लागवड करणेकामी बांबूची रोपे उपलब्ध करून देणेबाबत मा.आयुक्त सो. यांचे वृक्षप्राधिकरण व उद्यान विभागास तोंडी निर्देश प्राप्त झालेले आहेत.

याबाबत प्रथमतः शासकीय वनविभाग यांच्याकडून पत्राव्यवहार करून उपलब्ध होणारी रोपांची प्रजाती व संख्या माहिती घेण्यात आली असता सद्यस्थितीत शासकीय वनविभागापैकी वनविकास महामंडळ यांच्याकडून ५०,००० बांबूची रोपे शासकीय दराप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उर्वरीत ५०,००० बांबू रोपे शासकीय वनविभाग विभागाकडे सद्यास्थितीत उपलब्ध नाहीत. त्यामुळे कार्यक्रमाचे पर्यावरणाच्या अनुषंगाने, बांबू लागवडीचे उदिष्ट पुर्ण करणेकामी उर्वरीत ५०,००० रोपे आदिवासी बांधवाना उपलब्ध करून देणेकरीता खाजगी रोप वाटीकेमधून घेणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने, महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील भौगोलीक परिस्थीती व पर्यावरणाच्या दृष्टीने बांबू प्रजाती **१) मनवेल बांबू - वाढीचा वेग सुरूवातील मंद व जोरदार, निगा राखणेस सोईस्कर बांबू जाड मजबूत व टिकाऊ, प्रमुख वापर बांधकाम, शेड्स, शेती संरचना, शेतीसाठी, टोपल्याविणकाम, कागद, टिकाऊ उत्तन्न, कमी खर्च, पर्यावरणीय लाभ जास्त कार्बन शोषण, जमिनीचे संवर्धन इत्यादी.**
**२) तुलडा बांबू-: वाढीचा वेग- सुरूवातीपासून जलद, बांबू प्रकार- सरळ व मध्यम जाडीचा, दोन कंदामधील अंतर ६ इंच काढण्यास सोईस्कर, प्रमुख वापर- कागद उद्योग, फर्निचर, हस्तकला, प्लायवूड, अगरबत्ती कुल्फी कडी, औद्योगीक कच्चा माल, शेतकऱ्यास फायदा- चांगली बाजारपेठ, चांगला दर, पर्यावरणीय लाभ- औद्योगीक टिकाऊ पर्याय, लाकडाची बचत इत्यादी.** महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये योग्य पध्दतीने रूजून पर्यावरण पुरक ठरेल व स्थानिक आदिवासी बांधवांना त्याचा भविष्यात अर्थसहाय्य म्हणून लाभदायक टरेल. शासकीय वनविभाग यांच्याकडील वनविकास महामंडळ यांनी सादर केलेले दर प्रति रोप ३० रू. व सदर दरामध्ये वाहतूक व मजूर करीता येणार खर्च समाविष्ट करण्यात येत आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बांबूची प्रजाती | परिमाण (रोपांची उंची) | आवश्यक संख्या | रोपांचे दर वाहतूकीसहीत (शासकीय दरानुसार) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | मनवेल बांबू | २ ते ३ | २५,००० | ३० रू. | ७,५०,०००/- |
| २) | तुलडा बांबू | २ ते ३ | २५,००० | ३० रू. | ७,५०,०००/- |
| | | **एकूण** | **५०,०००** | **३० रू.** | **१५,००,०००/-** |

सदर वरील कोष्टकात बांबू रोपे खरेदी करणेकामी बाजारभावाव्दारे प्राप्त दरानुसार अंदाजीत एकूण **रक्कम रू. १५,००,०००/- (अक्षरी रू. पंधरा लक्ष रूपये मात्र/-)** इतका खर्च अपेक्षीत आहे. त्याकरीता, सदरचा होणारा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष वृक्षप्राधिकरण बियाणे व रोपे खरेदी रोप वाटीका खर्च लेखा सांकेतांक ५६७-२५४० तरतूद रक्कम ३.५० कोटी उपलब्ध असून सदरचा खर्च या रक्कमेतून भागविता येईल.

तरी, "१ कोटी वृक्ष लागवड मोहिम" अंतर्गत वनविभागाच्या रोपे होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव निर्णय :-**

सदर कामाकरीता खालील नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबब कारणास्तव) विलंब झाल्यास त्या-त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेणे बंधनकारक असेल.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात **"१ कोटी वृक्ष लागवड मोहिम" अंतर्गत (मनवेल बांबू व तुलडा बांबू प्रजातीची ५०,००० रोपे) खाजगी रोप वाटीकेमधून खरेदी करणेकामी खालील** कोष्टकात नमूद केल्याप्रमाणे

| अ.क्र. | बांबूची प्रजाती | परिमाण (रोपांची उंची) | आवश्यक संख्या | रोपांचे दर वाहतूकीसहीत (शासकीय दरानुसार) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | मनवेल बांबू | २ ते ३ | २५,००० | ३० रू. | ७,५०,०००/- |
| २) | तुलडा बांबू | २ ते ३ | २५,००० | ३० रू. | ७,५०,०००/- |
| | | **एकूण** | **५०,०००** | **३० रू.** | **१५,००,०००/-** |

सदर वरील रोपे खरेदी करणेकामी होणारी एकूण **रक्कम रू. १५,००,०००/- (अक्षरी रू. पंधरा लक्ष रूपये मात्र/-) करणेकरीता सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**(मनोजकुमार सुर्यवंशी) (भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** १२९०

**विभाग : घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक :** २५/०९/२०२५

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत **प्रभाग समिती ए ते आय** हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामासाठी सन २०२५-२६, २०२६-२७, २०२७-२८, २०२८-२९, २०२९-३० या ५ वर्षाकरिता ई-निविदा प्रक्रिया करुन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** नागरी घनकचरा व्यवस्थापन हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्रभाग समिती निहाय २० झोनसाठी दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे इत्यादी कामांसाठी सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या त्रैवार्षिक वर्षाकरिता सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६ दि.२०/०२/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता घेऊन दिनांक ०२/०३/२०१७ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरील निविदेत आलेल्या दरास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४४९ दिनांक १२/१२/२०१७ अन्वये प्राप्त दरास मान्यता देऊन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या त्रैवार्षिक निविदेच्या प्रक्रिये अंतर्गत प्राप्त झालेल्या निविदाधाराकांपैकी कमी दराच्या निविदाकारांच्या दरास मंजूरी देऊन करारनामा करुन कार्यादेश देणेस मंजूरी दिली होती. त्याअनुषंगाने दिनांक ३०/०१/२०१८ रोजी करारनामा करुन दिनांक २०/०२/२०१८ रोजीचा निविदाकारांना कार्यादेश देण्यात आलेला होता.

याकामी सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या त्रैवार्षिक वर्षाकरिता २० झोनमध्ये २० अभिकर्त्यांची नियुक्ती केली असून सदरचे काम १ वर्ष उशिरा सुरू झाल्याने दि.२०/०२/२०१८ रोजीच्या कार्यादेशा नुसार सदरचे काम १ वर्ष (सन २०२०-२१ पर्यंत) वाढवून दिलेले होते.

परंतु सदर निविदेचा कालावधी दि.२८/०२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रशासकीय ठराव क्र.५७८ दि.०८/०३/२०२१ अन्वये पुढील ६ महिन्याकरिता कोणतीही भाववाढ न देता प्रथम मुदतवाढ मंजूर केलेली होती.

त्यानंतर प्रशासकीय ठराव क्र.३४७, दि.१२/०७/२०२१ अन्वये सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता निविन ई-निविदा प्रक्रिया करणेस प्रशासकीय

ठराव मंजूर करण्यात आला होता आणि दि. २०/०७/२०२१ रोजी जाहिर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर निविदा न्यायप्रविष्ठ झाल्याने निविदेस खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात आली होती.

| अ. क्र. | ठराव | दिनांक | कालावधी | मुदतवाढ क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय ठराव क्र.५७८ | ०८/०३/२०२१ | ६ महिने | १ |
| २ | प्रशासकीय ठराव क्र.५२६ | २७/०८/२०२१ | ६ महिने | २ |
| ३ | प्रशासकीय ठराव क्र.०२ | ०६/०४/२०२२ | १ महिने | ३ |
| ४ | प्रशासकीय ठराव क्र.७५ | २२/०४/२०२२ | १ वर्ष | ४ |
| ५ | प्रशासकीय ठराव क्र.३०४२ | ३१/०३/२०२३ | ०१/०४/२०२३ ते ३०/०६/२०२३ | ५ |
| ६ | प्रशासकीय ठराव क्र.११७० | ३०/०७/२०२३ | ०१/०७/२०२३ ते ३०/०९/२०२३ | ६ |
| ७ | प्रशासकीय ठराव क्र.१७७८ | २७/०९/२०२३ | ०१/१०/२०२३ ते ३१/१२/२०२३ | ७ |
| ८ | प्रशासकीय ठराव क्र.२८६४ | २५/०१/२०२४ | ०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ | ८ |
| ९ | प्रशासकीय ठराव क्र.१९२५ | ३१/१२/२०२४ | ०१/०१/२०२५ ते २८/०२/२०२५ | ९ |
| १० | प्रशासकीय ठराव क्र.२३६० | २८/०२/२०२५ | ०१/०३/२०२५ ते ३१/०३/२०२५ | १० |
| ११ | प्रशासकीय ठराव क्र.२५९२ | २७/०३/२०२५ | ०१/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ | ११ |
| १२ | प्रशासकीय ठराव क्र.१५८ | २८/०४/२०२५ | ०१/०५/२०२५ ते ३०/०६/२०२५ | १२ |
| १३ | प्रशासकीय ठराव क्र. ८७४ | २६/०६/२०२५ | ०१/०७/२०२५ ते ३१/०७/२०२५ (१ महिना) | १३ |

सदर निविदेचा कालावधी वर नमुद तक्त्यातील अनु. क्र. १२ नुसार दि.३०/०६/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने नवीन ई-निविदा जाहिर करणे आवश्यक आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीत उपरोक्त निविदेमध्ये नागरी घनकचरा व्यवस्थापन हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्रभाग समिती निहाय २० झोनसाठी दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे इत्यादी कामांसाठी दि.११/१०/२०२४ अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. तथापि, ठराव क्र. १२९, दि. २३/०४/२०२५ अन्वये सदर निविदा

रद्द करुन फेर निविदा करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता. तद्नंतर नागरी घनकचरा व्यवस्थापन हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्रभागनिहाय दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे याकामी दि. ०९/०५/२०२५ रोजी निविदा जाहीर करण्यात आलेली होती. तथापि, सदर निविदा प्रशासकीय ठराव क्र. १२७५, दि.२६/०८/२०२५ रोजी रद्द करुन नविन निविदा करणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

त्याअनुषंगाने सन २०२५-२६, २०२६-२७, २०२७-२८, २०२८-२९ व २०२९-३० या ५ वर्षाकरिता महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांनी प्रारुप निविदा दि.२५/०९/२०२५ रोजी सादर केलेली आहे. याकामी जाहिर करण्यात येणाऱ्या निविदेमध्ये नागरी घनकचरा व्यवस्थापन हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्रभाग समिती (ए ते आय) साठी ५ वर्षाकरिता दैनंदिन रस्ते सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे याकामी येणारा खर्च वसई विरार महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन यांनी खालीलप्रमाणे सादर केलेल्या अहवालानुसार आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती | प्रभागनिहाय पाच वर्षाकरिता होणारा खर्च (अंदाजित रक्कम रुपये) |
|---|---|---|
| १. | ए | ९४,६०,७७,१७०/- |
| २. | बी | १,६१,०६,८९,९६५/- |
| ३. | सी | ८३,५९,६१,६४९/- |
| ४. | डी | १,२४,८३,७१,१९८/- |
| ५. | ई | १,०१,७०,९५,१४९/- |
| ६. | एफ | १,११,५०,५६,६१५/- |
| ७. | जी | ८१,९८,२४,१५३/- |
| ८. | एच | १,०५,१८,३५,९२५/- |
| ९. | आय | ९३,१५,०४,४१४/- |
| अंदाजित एकुण खर्च ( पाच वर्षाकरिता) | | ९५७,६४,१६,२३५/- |

त्याअनुषंगाने वसई विरार महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन यांनी प्रस्तावित केल्यानुसार सन २०२५-२६ साठी अंदाजित वार्षिक रक्कम रु.१७३,३०,८९,९९५/- एवढा खर्च होणार आहे. तसेच प्रतिवर्षी होणारा खर्च विचारात घेता WPI आणि CPI Index निर्देशानुसार होणारी भाववाढ गृहीत धरून पाच वर्षाकरिता अंदाजित खर्च रक्कम रु. ९५७,६४,१६,२३५/- एवढा होणार आहे.

सदरील वार्षिक खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **"घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह, रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटा गाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पध्दतीने नाले सफाई"** या लेखाशिर्षातील प्रस्तावित तरतुद **रु. ३५० कोटी** मधून भागविणे शक्य आहे. तसेच तरतुदीच्या अनुषंगाने येणारा फरक सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पामध्ये वाढविणेत येईल.

तरी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत **प्रभाग समिती ए ते आय** हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामासाठी सन २०२५-२६, २०२६-२७, २०२७-२८, २०२८-२९ व २०२९-३० या ५ वर्षाकरिता ई-निविदा प्रक्रिया करुन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सदरचा ठराव करण्यात येत आहे.

**ठराव निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत **प्रभाग समिती ए ते आय** हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामासाठी सन २०२५-२६, २०२६-२७, २०२७-२८, २०२८-२९ व २०२९-३० या ५ वर्षाकरिता ई-निविदा प्रक्रिया करुन अभिकर्त्याची नेमणूक करणेस व त्याकामी होणारा अंदाजीत वार्षिक खर्च रक्कम रुपये १७३,३०,८९,९९५/- एवढा असून प्रतिवर्षी होणारा खर्च विचारात घेता WPI आणि CPI Index निर्देशानुसार होणारी भाववाढ गृहीत धरून पाच वर्षाकरिता अंदाजित खर्च रक्कम रु. ९५७,६४,१६,२३५/- एवढ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाची ई-निविदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी** (भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**